(कार्यालयीन कामासाठी) (नगरसचिव कार्यालय)

# मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव.

मौलाना अबुल कलाम आजाद प्रशासकीय भवन,भुईकोट किल्ल्या समोर, रविवार वॉर्ड,ता. मालेगाव.

महासभा सप्टेबर -२०२६

---

**सभा क्र.०६** **सुचना** **कार्यपत्रिका क्र.०६**

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महापालिकेचे कामकाज नियम क्र.१ (क) अन्वये, मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार मालेगाव शहर महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण **सभा क्र. ०६ दिनांक २१/०९/२०२६, सोमवार रोजी दु.३:०० वा** महानगरपालिकेच्या साथी निहाल अहमद सभागृह येथे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. करीता सर्व सन्माननीय पालिका सदस्य व सर्व संबंधितांना विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहुन सहकार्य करावे.

---

**सदर सभेस खालील विषयांचा विचार होईल.**

---

विषय क्र. **९३** :- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./नगररचना / १८ / दि. ११/०८/२०२६ अन्वये, महानगपालिका क्षेत्रातील कॅम्प वार्डातील सि.स.नं.१०३७/२/१, सि.स.नं.१०३७/२/२, व सि.स.नं.१०३७/२/३ (जुना स.नं.२७/अ) मधील अंदाजित क्षेत्र २४२००.०० चौ.मि. या जागेचे मालक श्री.महेश तुळशीराम पाटोदिया यांनी त्यांचे मालकीचे क्षेत्र संपादन करणेकामी दि.२८/१०/२०२५ रोजी म.प्रा.नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना बजावली आहे. त्यानुसार सदरची जमीन भुसंपादन करणेकरीता मा.जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(साजिद अहमद हसन अब्बास)
नगरसचिव
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

टिप:- कार्यालयीन वेळेत विषया संदर्भातील कागदपत्र नगरसचिव विभागात पहाण्यासाठी उपलब्ध आहेत.

नगरसचिव जा.क्र.२८३ २०२६

दिनांक ११/०९/२०२६

Scanned with OKEN Scanner